"महाराष्ट्रातील मराठा समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे विश्लेषण : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा"

प्रास्ताविक :

भारतातील सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करत असताना जातीव्यवस्था खूप महत्त्वाची ठरते. मनुष्य हा समाजात राहून आपल्या गरजा, अडचणी सोडवण्याचा प्रयत्न करतो. भारतात जातीव्यवस्थेनुसारच लोकांचे राहणीमान, व्यवसाय, संस्कृती व आचार - विचार आहेत. कालऔघात त्यात परिवर्तन झाले असले तरी प्रथा, परंपरा, देणी - घेणी, व्यवहार, राहणी इत्यादी संदर्भात फारसे बदल झाले नाहीत. आजही जातीव्यवस्था आपले अस्तित्व टिकवून आहे.

भारतीय समाज अतिप्राचीन असून त्यात हिंदू धर्माचे प्राबल्य आहे. गेल्या पाच हजार वर्षापासून त्याचे संक्रमण सुरु आहे. भारतीय हिंदू समाज वेगवेगळ्या जाती - उपजातीमध्ये विभागलेला आहे. भारतातील कोणत्याही प्रदेशात एका 'जातीचे' प्राबल्य नसून अनेक जाती - उपजाती आहेत. मराठी विश्वकोष खंड सहामधील हिंदू धर्मात संपूर्ण भारतात ८००० जातीचा उल्लेख आहे.

प्राचीन काळी महाराष्ट्राला प्राकृतात 'महारठ्ठ' असे नाव होते. सम्राट अशोकाच्या काळात दक्षिण भारतात 'रठ्ठ' नाम लोक होते. तेच कालांतराने स्वत:ला महारठ्ठ म्हणून संबोधू लागले व त्याचे पुढे रुपांतर 'मराठा' असे झाले. महाराष्ट्रातील समाजव्यवस्थेत तीन प्रमुख जातीचे वर्चस्व दिसून येते. मराठा समाज त्यापैकी एक आहे. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येत जवळपास ३२% प्रमाण मराठा समाजाचे असून मराठा समाजाला एक वर्चस्वी सधन जात म्हणून ओळखले जाते. मराठा समाजातील बहुसंख्य लोक शेतकरी आहेत. ह्या जातीला

महाराष्ट्रातील जमीनदार, श्रीमंत, उच्चभ्रू जात समजले जात असले तरी ह्या जातीतील फार कमी लोकांकडे आर्थिक सुबत्ता व राजकीय सत्ता आहे. बहुसंख्य लोक कृषी आणि कृषिसंलग्न व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करतात. भारतीय शेती निसर्गावर आधारित असल्यामुळे त्यामध्ये अनिश्चितता दिसून येते. याचा परिणाम मराठा समाजाच्या आर्थिक स्थितीवर झालेला आहे.

मराठा समाजातील कुटुंबाकडे एकेकाळी मोठ्या प्रमाणात जमीन होती, परंतु दर पिढीला जमिनीचे होणारे तुकडीकरण, निसर्गावरील अवलंबित शेती आणि उत्पादन खर्चात होणारी वाढ यामुळे या समाजाची आर्थिक स्थिती ढासळली आहे. त्यामुळे त्यांच्या उत्पन्न, उपभोग, रोजगार, बेकारी, राहणीमान, सामाजिक प्रवृत्ती, लोकसंख्याविषयक वैशिष्ट्ये, शिक्षण, आरोग्य इत्यादी घटकांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. म्हणून "महाराष्ट्रातील मराठा समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे विश्लेषण : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा" ह्या विषयाची निवड अभ्यासासाठी करण्यात आली आहे.

१. संशोधन समस्या :

महाराष्ट्राची निर्मितीच मूळात मराठी भाषा बोलणाऱ्यांचा प्रांत म्हणून झाली आहे. महाराष्ट्रातील समाजव्यवस्थेत मराठा समाजाचे विशेष असे स्थान आहे. महाराष्ट्राच्या लोकसंख्येत मराठा समाजाची लोकसंख्या ३२%च्या आसपास आहे. एकेकाळीचा उच्चभ्रू, सधन आणि वर्चस्व असणारा समाज म्हणून मराठा समाज ओळखला जातो. यात बहुसंख्य लोकसंख्या ही शेतकरी वर्गाची आहे. व्यापार, उद्योग करणाऱ्यांचे प्रमाण मात्र तुरळक आहे. काही शेतकरी कुटुंब सक्षम आहेत. तथापि तीन दशकात महाराष्ट्रात अनिश्चित पाऊस, सातत्याचा दुष्काळ व शेतीच्या खर्चात झालेली वाढ यामुळे शेतकरी कायमस्वरूपी कर्जबाजारी बनला आहे.

दर पिढीमागे जमिनीचे तुकडे पडत गेले आणि कृषी व्यवसाय करणे अनार्थिक होत गेले. जमिनधारणा आणि उत्पादन क्षमता घसरली. त्यामुळे शेतकरी मराठा समाजाला दारिद्र्याने ग्रासले. मराठा समाजातील मूठभर व्यक्ती शैक्षणिक, आर्थिक व सामाजिकदृष्ट्या चांगल्या स्थितीत असले तरी बहुसंख्य समाज हा चांगल्या स्थितीत नाही. आजपर्यंत विविध जाती - समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन अनेक अभ्यासकांनी केले आहे, परंतु मराठा समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन अद्यापपर्यंत कोणीही केले नाही. त्यामुळे ह्या विषयाची निवड अध्ययनासाठी करण्यात आली आहे.

२. अध्ययनाचे महत्त्व :

अर्थव्यवस्थेतील प्रत्येक घटक महत्त्वाचा असून त्याचे विशिष्ट स्थान अर्थव्यवस्थेत असते. महाराष्ट्राच्या लोकसंख्येत मोठे प्रमाण नसले तरी महाराष्ट्राच्या जाती व्यवस्थेतील एक महत्त्वपूर्ण असा मराठा समाज आहे. समाजाचे अर्थव्यवस्थेत विशेष स्थान असून त्याचा अर्थव्यवस्थेवर परिणाम घडून येतो. म्हणून मराठा समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे महत्त्वाचे ठरते. भारतीय अर्थव्यवस्था कृषिप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते आणि मराठा समाजाचे बहुसंख्य लोक हे शेतकरी आहेत. त्याचे अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्यामुळे मराठा समाजाचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व लक्षात घेऊन 'महाराष्ट्रातील मराठा समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे विश्लेषण : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा' हा विषय अभ्यासासाठी निवडण्यात आला आहे.

३. संशोधनाची उद्दिष्ट्ये :

प्रस्तुत अध्ययन मराठा समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीच्या

विश्लेषणावर आधारित आहे. कोणत्याही प्रश्नाचा अभ्यास निश्चित व्हावा अशी उद्दिष्ट्ये प्राप्त करण्याच्या हेतूने अभ्यास केला जातो. संबंधित विषयाकरिता पुढील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली आहेत.

3.1) मराठा समाजाच्या उत्पन्न, रोजगार, उपभोग प्रवृत्ती, बेकारी, आरोग्य स्थलांतरण, लोकसंख्याविषयक वैशिष्ट्ये इत्यादीच्या सहाय्याने आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

3.2) मराठा समाजाच्या व्यावसायिक विभागणीचे अध्ययन करणे उदा. शेती, व्यापार, उद्योग इत्यादी.

3.3) मराठा समाजातील महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

3.4) मराठा समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

3.5) मराठा समाजातील विविध सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे.

3.6) मराठा समाजाचा सामाजिक स्तर आणि आर्थिक स्तर यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

४. संशोधनाची गृहितके :

प्रस्तुत अध्ययन विषयाचे विश्लेषण करीत असताना काही गृहितकृत्ये मांडली आहेत ती पुढीलप्रमाणे आहेत.

4.1) बहुतांश मराठा समाजाची आर्थिक स्थिती अत्यंत हालाखीची आहे.

4.2) मराठा समाजात शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.

4.3) मराठा समाजातील व्यक्तींचे दरडोई उत्पन्न कमी आहे.

4.4) मराठा समाजातील महिलांचा आर्थिक व सामाजिक स्तर कनिष्ठ आहे.

५. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत शोध प्रबंधाच्या अनुषंगाने मराठा समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे विश्लेषण करण्याकरिता नांदेड जिल्ह्याची संशोधन क्षेत्र म्हणून निवड केली आहे. महाराष्ट्र राज्यात मराठा समाजाची लोकसंख्या कमी - अधिक प्रमाणात सर्वच विभागात आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधनाचे सामान्यीकरण करता येते. संशोधनाची सत्यता, वस्तुनिष्ठता आणि विश्वसनियता याला बाधा निर्माण होतात. त्यामुळे संशोधनात अधिक सुस्पष्टता आणण्याकरिता संशोधन प्रबंधाच्या काही मर्यादा स्पष्ट केल्या आहेत.

5.1) प्रस्तुत अध्ययनात नांदेड जिल्ह्यातील ज्या तालुक्यात मराठा समाजाची लोकसंख्या अधिक आहे, त्यांचीच अध्ययनासाठी निवड करण्यात आली †ÖÆê.

5.2) मराठा समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे विश्लेषण करण्याकरिता सामाजिक निर्देशकांची निवड करण्यात आली आहे. जसे कुटुंब, जातीची रचना, शिक्षण, जमीनधारणा, व्यवसाय, उत्पन्न - उपभोग, लोकसंख्या विषयक वैशिष्ट्ये इत्यादी.

5.3) विशिष्ट कालावधीतील आर्थिक व सामाजिक स्थितीचेच विश्लेषण करण्यात †Ö»Ö †ÖÆê.

5.4) मराठा समाजाच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करताना विविध आवश्यक गणितीय व संख्याशास्त्रीय साधनांचाच वापर करण्यात आला आहे.

5.5) सदरील अध्ययनाकरिता माहितीचे संकलन कुटुंब प्रमुखाकडून करण्यात आले असून त्यावरून विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

5.6) प्रस्तुत संशोधनात मराठा समाजाचेच विश्लेषण करण्यात आले असून इतर घटकांकडे दूर्लक्ष करण्यात आले. आवश्यक त्या ठिकाणी संदर्भ देण्यात आला आहे.

5.7) महाराष्ट्र राज्याच्या सर्व जिल्ह्यात मराठा समाजाची लोकसंख्या विखुरलेली असली तरी अध्ययनाकरिता नांदेड जिल्ह्याची निवड करण्यात आली †ÖÆê.

5.8) मराठा समाजाच्या लोकसंख्याविषयक वैशिष्ट्यांचा अभ्यास करण्यासाठी १९३१ च्या जनगणनेचा संदर्भ घेण्यात आला आहे. २०११ मध्ये जातीनिहाय जनगणना झाली असली तरी त्या संदर्भातील आकडेवारी प्रसिध्द करण्यात आली नसल्यामुळे ती उपलब्ध होऊ शकली नाही.

६. संशोधन पध्दती :

नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचे विश्लेषण करण्यासाठी प्राथमिक माहितीच्या स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे, तरी आवश्यक त्या ठिकाणी दुय्यम स्त्रोत देखील वापरण्यात आले आहेत. त्यात संदर्भ ग्रंथ, विविध प्रकाशन व लेखकांची पुस्तके, लेख, नियतकालिके (वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके), शासनाचे विविध अहवाल इत्यादीचा उपयोग करण्यात आला आहे.

६.१) क्षेत्राची निवड :

महाराष्ट्र ही मराठी भाषिकांची भूमी म्हणून ओळखली जाते. इथे अनादी कालापासून मराठी भाषीक वास्तव्यास आहेत. त्यात अनेक जाती, संप्रदायाचे लोक समाविष्ट आहेत. महाराष्ट्राच्या विविध विभागापैकी एक मराठवाडा विभाग असून त्यातील औरंगाबाद नंतरचा महत्त्वपूर्ण जिल्हा म्हणून नांदेड जिल्हा ओळखला जातो. नांदेड जिल्ह्याची संशोधन क्षेत्र म्हणून निवड करण्यामागे विविध कारणे कारणीभूत आहेत.

6.1.1) नांदेड हे महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील औरंगाबादनंतरचे महत्त्वपूर्ण जिल्ह्याचे ठिकाण आहे.

6.1.2) मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्यातील सहभाग अशा ऐतिहासिक घटना आणि राज्यशासनाचे नेतृत्त्व, विविध पदे भूषवण्याचे सामर्थ्य असलेला x•Ö»ÆÖ म्हणून नांदेड जिल्हा ओळखला जातो.

6.1.3) नांदेड हे गोदावरी तटावर वसलेले शहर, साधुसंताची परंपरा आणि सांस्कृतिक वारसा लाभलेला जिल्हा आहे.

६.२) तालुक्यांची निवड :

नांदेड जिल्ह्यात १६ तालुके असून त्यातील ज्या तालुक्यामध्ये मराठा समाजाच्या लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे, त्यांची अध्ययनासाठी (साध्या यादृच्छिक पध्दतीने) निवड करण्यात आली आहे.

६.३) गावांची निवड :

नांदेड जिल्ह्यात १६ तालुक्यांत एकूण १५४१ गावे आहेत. त्यापैकी ५% गावांची निवड करण्यात आली आहे. त्यासाठी जातीविषयक जनगणनेचा आधार घेतला आहे. त्यानुसार ८० गावांची नमुना म्हणून निवड करण्यात आली. संशोधनाचा आकार निश्चित करण्यासाठी माहितीची सहा उपसमग्रात विभागणी केली आहे.

6.3.1) 5,000पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली गावे.

6.3.2) २,५०० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली गावे.

6.3.3) १,५०० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली गावे.

6.3.4) १,००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली गावे.

6.3.5) नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यांची ठिकाणे.

6.3.6) एक जिल्ह्याचे ठिकाण (स्तरीत यादृच्छिक नमुना निवड).

६.४) कुटुंबाची निवड :

प्रस्तुत अध्ययनासाठी मराठा समाजातील कुटुंबाची निवड बहुटप्पीय नमुना निवड पध्दतीने केली आहे. त्यासाठी मराठा समाजातील कुटुंबाची विभागणी खालील प्रमाणे करण्यात आली आहे.

6.4.1) शेतकरी मराठा -

- i. जमीनदार मराठा
- ii. मध्यम भू-धारक मराठा
- iii. अल्प भू-धारक मराठा

6.4.2) ¿ÖŸÖ´Ö•Ö¸ ´Ö¸ÖšÖ

6.4.3) राजकारणी मराठा

6.4.4) व्यावसायीक मराठा

6.4.5) नौकरदार मराठा

6.5) माहितीचे संकलन :

माहितीचे संकलन करण्यासाठी दोन पध्दतीचा अवलंब करण्यात †Ö»ÖÖ †ÖÆê.

6.5.1) प्राथमिक स्त्रोत ज्यात निरीक्षण, अनुसूचिद्वारे मुलाखती, संबंधितांशी “Ö“ÖÖ ‡ŸµÖÖ¤ß.

6.5.2) द्वितीय स्त्रोतामध्ये शोधनिबंध, विविध संशोधन पत्रिका, संदर्भ ग्रंथ, शासकीय अहवाल, शासकीय कार्यालयातील माहिती,

वर्तमानपत्रे, नियतकालिके, साप्ताहिके, जिल्हा गॅझेटिअर, जनगणना अहवाल, संशोधन संस्थेचे अहवाल, विविध शासकीय संस्थानी जमा केलेली माहिती इत्यादी साहित्याचा उपयोग करून आवश्यक ती माहिती संकलित करण्यात आली आहे.

6.6) तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन :

मराठा समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्यन करण्यासाठी गुणात्मक आणि सांख्यिकीय साधनांचा उपयोग करण्यात आला आहे. विविध गणितीय सांख्यिकीय साधनांच्या सहाय्याने संख्यात्मक माहितीचे विश्लेषण करण्यात आले असून गुणात्मक घटकांचा अभ्यास वर्णनात्मक पध्दतीने करण्यात आला †ÖÆê.

संख्यात्मक साधनामध्ये प्रमाण, सरासरी, विविध चाचण्यांचा उपयोग करण्यात आला आहे.

७) प्रकरणांची रुपरेषा :

1) प्रकरण पहिले : प्रस्तावना

महाराष्ट्रातील समाजव्यवस्था, मराठा समाज उगम, ऐतिहासिक पार्श्वभूमी, वैशिष्ट्ये, संस्कृती, संशोधन पध्दतीचा अभ्यास करण्यात येईल.

2) प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचा आढावा

प्रस्तावना, आढावा, सैध्दांतिक चौकट.

3) प्रकरण तिसरे : महाराष्ट्राची सामाजिक, भौगोलिक पार्श्वभूमी

भौगोलिक स्थिती, ऐतिहासिक पार्श्वभूमी, लोकसंख्या, कृषी, उद्योग, व्यापार, बॅकींग, दळणवळण व वाहतूक, प्रशासन इ. अभ्यास करण्यात येईल.

4) प्रकरण चौथे : नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजाच्या सामाजिक ÛÃ£ÖŸÖß“Ö †³µÖÖÃÖ

मराठा समाजाचे सामाजिक स्थान, कुटुंब पध्दती, शिक्षण, आरोग्य, व्यवहार, संपत्ती, जमीनधारणा, महिलांची सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला जाईल.

5) प्रकरण पाचवे : नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजाच्या आर्थिक ÛÃ£ÖŸÖß“Ö †³µÖÖÃÖ

लोकसंख्याविषयक वैशिष्ट्ये, उत्पन्न, रोजगार, उपभोग प्रवृत्ती, बेकारी, व्यावसायिक विभागणी, शेती, उद्योग, व्यापार, राहणीमान, आरोग्य, महिलांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करण्यात येईल.

6) प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी

संशोधक	मार्गदर्शक
देशमुख नयना निवृत्तीराव	¯ÖÖ.›Ö.²ÖÖß.²ÖÖß. ¯ÖÖ¾Ö›ê
	अर्थशास्त्र विभाग प्रमुख
	के.आर.एम. महिला महाविद्यालय, नांदेड.

ÃÖ¤|³Ö ÃÖ“Öß :

1) भांडारकर पु.ल., 'सामाजिक संशोधन पध्दती', महाराष्ट्र विद्यपीठ ग्रंथ निर्मिती, मंडळ, नागपूर, तिसरी आवृत्ती १९८७.

2) आगलावे प्रदीप, 'सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, दुसरी सुधारित आवृत्ती २००८.

3) कुलकर्णी बी.डी., ढमढेरे एस.व्ही. , 'अर्थशास्त्रीय संशोधन पध्दती' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००७.

4) देशमुख आर.एस., 'मूलभूत सांख्यिकी', विद्या प्रकाशन, नागपूर, २००६.

5) देशमुख रा.ना., 'आपला नांदेड जिल्हा', कल्पना प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती जून, २००६.

6) पगडी सेतू माधवराव, 'महाराष्ट्र आणि मराठे', जोशी आणि लोखंडे कंपनी, पुणे, १९७०.

7) पगडी सेतू माधवराव, 'मोगल आणि मराठे', जोशी आणि लोखंडे कंपनी, पुणे, १९७०.

8) मोहिते वीर उत्तमराव, 'मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास', जिजाई प्रकाशन, पुणे, १९८८.

9) गायकवाड आर.डी., सरदेसाई बी.एन., थोरात टी.डी., हनमाने व्ही.एन. 'मराठेकालीन संस्था व विचार', फडके प्रकाशन, कोल्हापूर, तृतीय †Ö¾Ö¢Öß 1990.

10) साळुंखे नीरज, 'दैत्यबळी व कुंतलदेश महाराष्ट्र', लोकायत प्रकाशन ÃÖÖŸÖÖ¸üÖ, ×«üŸÖßµÖ †Ö¾Ö¢Öß, 2007.

11) पाठक अरुणचंद्र श., 'महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर - नांदेड जिल्हा भाग ०१ व ०२', दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

12) Karve Irawati 1968, Maharashtra State Gazetteer Govt. of Maharashtra, 'Maharashtra-Land and It's People Bombay', Directorate of Govt. Printing.

13) Gupta S.P., Statistical Methods, Sultan Chand and Son's, New Delhi (1969 & Reprint 2009).

14) Census of India, Central Provinces Delhi - 1931.

15) www.cenus2011.co.in/data/district/349-nanded.maharashtra.html

16) मराठी विश्वकोश खंड सहा, जोशी लक्ष्मणशास्त्री प्रमुख संपादक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्रथम आवृत्ती १९७७.

17) देशमुख कल्पना पुंडलिकराव, 'नांदेड जिल्ह्यातील वतनदार देशमुख घराण्यांचा इतिहास', मे २००७, अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध, स्वा.रा.ती.म., नांदेड.

18) देशमुख मनिषा बाबुराव, 'मराठा समाजातील महिला नेतृत्त्व : मराठवाड्याचा विशेष अभ्यास', मे २०१२, अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध, स्वा.रा.ती.म., नांदेड.